CMYK

आमदार सिद्धार्थ खरात यांचे गावोगावी जल्लोषात स्वागत, मतदारसंघात विजयाचा आनंदोत्सव >> पान 2

मोहन भागवत जे बोलले ते त्यांनी नरेंद्र मोदींना जाऊन सांगावे >> पान 3

धाड दंगल प्रकरणातील मुळाशी जाऊन दोषींवर कडक कारवाई करा >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 112 ■ सोमवार, दि. 02 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

स्वतःची ओळख आणि आत्मविश्वास जीवनात महत्त्वाचे आहेत.



'फिल्म इंडस्ट्री हादरली, आणखी एका अभिनेत्रीने गळफास लावून आयुष्य संपवलं आतील पान

# फडणवीसच; पण गृह कोणाकडे?

## एकनाथ शिंदे मुंबईत परतल्याने खातेवाटपाची चर्चा आजपासून

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असून त्यांच्या नावावर भाजप पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब केले आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास राजी झाले असले तरी गृहखाते मिळावे, या मागणीवर ते ठाम असून भाजपची त्यास तयारी नाही. त्यामुळे आता गृहखात्यावरून तिढा असून हे खाते कोणाकडे जाणार, याविषयी तर्कवितर्क सुरू आहेत. भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक मंगळवार किंवा बुधवारी होण्याची शक्यता असून त्या वेळी फडणवीस यांच्या नावाची घोषणा होईल.



एकनाथ शिंदे साताऱ्यातील दरे या आपल्या मूळ गावाहून ठाण्यात परतले. ते सोमवारी मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' शासकीय निवासस्थानी आल्यानंतर महायुतीतील खातेवाटप व मंत्रिमंडळातील संभाव्य नावांवर चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे. भाजप पक्षश्रेष्ठींनी फडणवीस यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी निश्र्चित केले असून नेता निवडीसाठी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी केंद्रीय निरीक्षकांच्या नियुक्तीची घोषणा सोमवारी केली जाण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसह अनेक लोकोपयोगी योजना राबविल्याने व महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लावल्याने जनतेने भरभरून मते दिली, असे शिंदे यांनी रविवारी सातारा येथील पत्रकार परिषदेतही नमूद करून महायुतीच्या यशात आपलाही मोठा वाटा असल्याचे व सत्तेतही मोठा सहभाग अपेक्षित असल्याचे संकेत दिले. शिंदे यांच्या अनुपस्थितीतच पवार यांच्याशी चर्चा करून भाजपने शपथविधी समारंभ ५ डिसेंबरला आयोजित करण्याची घोषणा केली. पण अजून महायुतीतील तीनही पक्षांना किती मंत्रीपदे मिळावीत, खातेवाटप कसे असावे आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्याकडून मंत्रीपदांसाठी कोणाची निवड केली जाणार, या बाबींवर शिंदे, फडणवीस व पवार यांच्यात सोमवारपासून चर्चा सुरू होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांच्यातील चर्चेतून मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून तोडगा निघाला नाही तर पुन्हा दिल्लीत चर्चेची आणखी एक फेरी होऊ शकते, असेही सांगण्यात येत आहे. शिंदे हे माघार घेण्याच्या मन:स्थितीत नाहीत हेच त्यांच्या देहबोलीवरून स्पष्ट झाले.

शिंदे हे गेल्या दोन–तीन दिवसांपासून दरे गावी गेल्याने महायुतीतील चर्चा थांबली होती. शिंदे, फडणवीस व पवार यांनी मुंबईत चर्चा करून खातेवाटप व संभाव्य मंत्रिमंडळाबाबत निर्णय घेण्याची सूचना शहा यांनी दिल्लीतील बैठकीत दिली होती. पण शिंदे गावी गेल्याने व आजारी पडल्याने ही चर्चा होऊ शकली नाही. या तीनही नेत्यांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सोमवारपासून सुरू होतील, असे सूत्रांनी सांगितले.

## शपथविधी सोहळ्याला महायुतीची सर्व लोक उपस्थितीत राहणार संजय शिरसाट यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शपथविधी सोहळ्याला महायुतीची सर्व लोक उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती शिवसेनेचे नेते आमदार संजय सिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला जे बहुमत मिळालेले आहे, ज्या जनतेने बहुमत दिलेले आहे त्यांचे आभार आणि ते या सोहळ्यात सहभागी व्हावे म्हणून हा प्रयत्न विधानभवनात लिमिटेड लोकांना जागा असल्याने तो कार्यक्रम आझाद मैदानात घेण्यात येणार आहे.महायुतीचे सर्व लोक उपस्थितीत असणार आहेत. मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्याची घोषणा ४ नोव्हेंबरला होईल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज मुंबईला येत आहेत. त्यांची आल्यानंतर प्रकृती कशी आहे ते पाहुन बैठक आज रात्री किंवा उद्या होऊ शकते, अशी माहिती शिवसेनेचे नेते तथा आमदार संजय सिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## महाराष्ट्राच्या निवडणूक निकालानंतर केजरीवालांचा काँग्रेसला धक्का

### दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीबाबत मोठा निर्णय

दिल्ली : हरियाणा व महाराष्ट्रात काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर आम आदमी पार्टी सतर्क झाली आहे. अशातच या पक्षाने दिल्लीची आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी निवडणुकीआधी 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. त्यांनी रविवारी (१ डिसेंबर) दुपारी पत्रकार परिषद घेऊन त्यांचा निर्णय जाहीर केला. केजरीवाल म्हणाले, आगामी दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी कोणत्याही पक्षाबरोबर आघाडी करणार नाही. आमच्या पक्षाने ही निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे.



अरविंद केजरीवाल यांनी आतापर्यंत आघाडीबाबत ठाम भूमिका मांडली नव्हती. मात्र, हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीनंतर आपने कोणत्याही पक्षाशी युती अथवा आघाडी न करण्याचा सूर आळवला होता. त्यावर आज शिक्कामोर्तब झालं.

काँग्रेसने हरियाणात आम आदमी पार्टीला बरोबर घेतलं नव्हतं. तसेच त्या निवडणुकीत काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला होता. पाठोपाठ महाराष्ट्रात काँग्रेसने शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन मोठ्या पक्षांशी आघाडी केली होती. तरीदेखील महाराष्ट्रात काँग्रेसला केवळ १६ जागा जिंकता आल्या. दोन राज्यांमध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर आता आम आदमी पार्टीने काँग्रेसबरोबर आघाडी न करण्याचा निर्णय घेतला आहे. केजरीवाल यांच्या पक्षाने दिल्लीची विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. केजरीवालांच्या या निर्णयामुळे दिल्लीत पुन्हा एकदा आप, भाजपा व काँग्रेसमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

**आपचा स्वबळाचा नारा**

आपने लोकसभा निवडणुकीत काँग्रेसशी आघाडी केली होती. मात्र त्या निवडणुकीत त्यांना फायदा झाला नाही, असं आप नेत्यांनी जाहीरपणे बोलून दाखवलं होतं. तर, हरियाणात सत्ता मिळण्याची शक्यता दिसू लागल्यावर काँग्रेसने या राज्यात मित्रपक्षांना बरोबर घेतलं नाही. सुरुवातीला आप व काँग्रेसमध्ये आघाडी करण्याबाबत व जागावाटपावर चर्चा झाली. मात्र आपला काँग्रेसने अधिक जागा देण्यास नकार दिल्यानंतर तिथे आघाडी होऊ शकली नाही. परिणामी दोन्ही पक्ष वेगवेगळे लढले. या राज्यात काँग्रेसला पराभवाचा सामना करावा लागला.

दरम्यान, आपने दिल्लीची विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आप नेत्यांनी हरियाणाच्या निवडणुकीवेळीच याबाबतचे संकेत दिले होते. पक्ष प्रमुखांनी आज त्यावर शिक्कामोर्तब केलं.

## महिला सक्षमीकरणासाठी 'आरपीएसआय' चतु:सूत्री महत्त्वाची

### कोची येथील गोलमेज परिषदेत डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सार्वजनिक मोहिमेच्या अंमलबजावणी, नियोजन आणि मूल्यमापनात महिलांचा सक्रिय सहभाग असल्याशिवाय मोहीम यशस्वी होऊ शकत नाही असा माझा ठाम विश्र्वास आहे. महिला सक्षमीकरणासाठी 'आरपीएसआय' चतु:सूत्री महत्त्वाची आहे असे प्रतिपादन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

कोची येथे राजकीय महिलांचे नेटवर्क गोलमेज परिषदचे आयोजिन करण्यात आली होते. दि. २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या दोन दिवसीय परिषदेत महिलांच्या सक्षमीकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विधानपरिषदेच्या उपसभापती आणि स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्ष डॉ.नीलम गोऱ्हे यांनी 'महिला सक्षमीकरणासाठी खासदार आणि आमदार महिलांचे राजकीय नेटवर्क तयार करण्याची भूमिका आणि पद्धती' या विषयावर मार्गदर्शन करुन गोलमेज परिषदेचा समारोप केला.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या की, १) लैंगिक समानतेच्या दृष्टीकोनातून प्रतिसाद देणारे आणि जबाबदार नेतृत्व

२) स्थानिक ते राष्ट्रीय स्तरापर्यंत जाळे विकसित करण्यासाठी, दर्जेदार वेळ आणि कामावर आधारित निर्णय घेण्यासाठी मापदंड.

३) भारतीय राजकारणातील विविध क्षेत्रांसाठी बहुलता आणि विविधतेसाठी जागा

४) कायदेशीर बाबी, धोरणात्मक निर्णय, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या घडामोडी यावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक ही महिला सक्षमीकरणासाठी आरपीएसआय' चतु:सूत्री महत्त्वाची आहे. असे सांगून डॉ.गोऱ्हे म्हणाल्या की, चार दशकांहून अधिक काळ एक सामाजिक कार्यकर्ता या नात्याने मी माझ्या सर्व कार्यात नेहमीच महिलांना केंद्रस्थानी ठेवले आहे. सरकारने सुरू केलेल्या विविध कृती, कल्याणकारी योजना, उपक्रम यांचे महत्त्व लक्षात घेता तळागाळात त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज संस्थामध्ये तसेच भारतीय संसदेत महिलांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. लोकसंख्येतील महिलांचे प्रमाण लक्षात घेता, हा संसदेतील महिलांच्या आरक्षणाचा महत्वपूर्ण निर्णय एक स्वागतार्ह पाऊल आहे.



महिला खासदार, आमदार, याबाबत धोरण बनवण्याच्या टप्प्यावर, त्याच्या योग्य अवलंब करण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि शाश्र्वत विकासासाठी पुरेसा निधीची विशेष तरतूद करण्यात यावी. विधिमंडळातील राष्ट्रकुल संसदीय मंच देखील या दिशेने अधिक योगदान देऊ शकतो. तसेच जागतिक महिला आयोगाचे ६९ सत्र आणि बीजिंग + ३० थीमसाठी निवडून आलेल्या सदस्यांमध्ये आणि त्यांच्या मतदारसंघांमध्ये अधिक जागरूकता होणे आवश्यक आहे.

जागतिक ते स्थानिक पातळीवर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात महिला आघाडीवर आहेत. महिला गटांचे डिजिटलायझेशन आणि क्षमता निर्माण कार्यक्रमाची गरज आहे. संसद आणि विधान मंडळांनी सामाजिक–आर्थिक आणि पर्यावरणविषयक समस्यांवर प्रत्येक सत्रात आपापल्या सभागृहात अर्थपूर्ण आणि परिणामाभिमुख चर्चा केली पाहिजे.

डॉ.गोऱ्हे म्हणाल्या महिला सबलीकरणाचा राष्ट्रीय आढावा आरोग्य, शिक्षण, महिला आणि मुलींची सुरक्षा यावर विशेष लक्ष केंद्रित करून महिला आमदारांची राष्ट्रीय गोलमेज परिषद आयोजित केली जावी. महिलांचा आर्थिक विकास आणि शाश्र्वत विकासाचे उद्दिष्टे एकत्रित करण्याची गरज आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी महिलांना प्रोत्साहित केले गेले आणि त्यामुळे अनेक मतदारसंघात विजय मिळवला गेला. या सर्व महिला मतदार निश्र्चितपणे शाश्र्वत विकासाच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या पुरस्कर्त्या बनल्या आहेत . असे ही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत महिला लोकप्रतिनिधींच्या नेटवर्क संदर्भात निर्णय घेण्यात आला.

## ईव्हीएम हॅकिंगचा दावा भोवला, सायबर पोलिसांकडून गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याच्या विधानसभा निवडणुकीत अनेकांना धक्का देणारे निकाल लागले. त्यानंतर पुन्हा एकदा ईव्हीएम हॅकिंग, प्रोग्रामिंगचा मुद्दा चर्चेत आला. ईव्हीएम हॅक करणे शक्य असल्याचा दावा अनेकांनी केला. मात्र, आपणही ईव्हीएम हॅक करू शकतो असा दावा करणे एकाला चांगलेच महागात पडले आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम) हॅक करणे शक्य आहे, असा दावा करणाऱ्या सय्यद शुजा याच्याविरोधात निवडणूक आयोगाच्या तक्रारीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सायबर पोलिस ठाण्यात शनिवारी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि माहिती–तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणी आता तपास सुरू करण्यात आला आहे.

सायबर पोलिसांच्या माहितीनुसार, सय्यद शुजा याने अनेक धक्कादायक दावे केले होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत वापरलेल्या ईव्हीएम बनवणाऱ्या टीममध्ये आपणही होतो, असा दावा केला होता. एका विशिष्ट प्रणालीचा वापर करून ईव्हीएममध्ये फेरफार केला जाऊ शकतो, असा दावा त्याने केला. काँग्रेसचे माजी नेते कपिल सिब्बल यांनी देखील या दाव्यांच्या आधारे ईव्हीएमवर प्रश्र्न उपस्थित केले.

## पटोलेंना ईव्हीएमवर शंका असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा, पुन्हा बॅलेटवर निवडणूक लढवावी

### आमदार परिणय फुके यांची नाना पटोले यांच्यावर टिका

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : नाना पटोले मागच्यावेळी ५ हजार मतांनी निवडून आले होते. त्यावेळी सुद्धा त्यांनी ईव्हीएमवर आरोप लावले होते. यावेळी ते २०८ मतांनी निवडून आले, पाच वर्ष मतदारसंघाशी सबंध न ठेवता ईव्हीएमवर दोष देत आहेत. पटोलेंना जर ईव्हीएमवर शंका असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा आणि पुन्हा बॅलेटवर निवडणूक लढवावी, आमचे अविनाश ब्राह्मणकर परत निवडणूक लढतील, असे चॅलेंज आमदार परिणय फुके यांनी नाना पटोले यांना माध्यमांशी बोलताना दिले. यावेळी आमदार डॉ.परिणय फुके म्हणाले की, ईव्हीएम संगणका सारखी मशीन नाही, ती हॅक होऊ शकत नाही, ते कॅल्क्युटर सारखी मशीन आहे त्याला काही करु शकत नाही, जनतेने नाकारले असल्याने ईव्हीएमला दोष देत आहेत.लोकसभेत मतदारांच्या नावात फार घोळ होता, मतदान कमी झाले, सुट्टीचे दिवस होते पण यावेळी मोठ्या संख्यने मतदार बाहेर आले. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांनी मोठ्या उत्साहात मतदान केले म्हणून टक्केवारी वाढली आहे.पाच वाजल्यानंतर मतदरांची मतदान केंद्रावर गर्दी वाढली होती, प्रत्येक बुथवर मतदारांच्या मोठ्या रांगा होत्या. नाना पटोले मतदानाच्या दिवशी बुथवर न जाता मंदिर, मस्जिदमध्ये प्रार्थना करत होते. म्हणून त्यांना या गोष्टी माहित नाहीत, लोकसभेत यश मिळाले तेव्हा दोष ईव्हीएमला दिला नाही, अनेक राज्यात निवडणुका झाल्या पण आज महाराष्ट्रात हरल्यानंतर सांगत आहेत की ईव्हीएम हॅक होऊ शकते. नाना पटोले निष्क्रीय आहेत असा आरोप काँग्रेसचे नेते अनेक वर्षांपासून करत आहेत. नाना पटोलेंची कार्यपद्धती, वागणूक यावर काँग्रेस पक्षातील नेते नाराज होते. लोकसभेच्या तिकीट विकण्याचे आरोप पटोले यांच्यावर झाले, बंटी शेळकेंना नोटीस दिली की,या पक्षात कोणाला



बोलण्याचा अधिकार नाही हे यातून दिसून होते. नाना पटोले वारंवार सांगतात की भाजप लोकशाहीच्या विरोधात आहेत, दडपशाही करतात,आज पटोले त्याच प्रकारची वागणूक त्यांच्या पक्षातील नेत्यांना देत आहेत. मलाही माध्यमातूनच शपथ विधी बद्दल कळले, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले पाहिजे, महायुती म्हणून फडणवीस यांच्या नेतृत्वात यश मिळाले आहे. कोण मंत्री असतील यावर पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील, त्यावर मी काही बोलू शकणार नाही, असे मतही यावेळी आमदार डॉ.परिणय फुके यांनी व्यक्त केले.



CMYK

# आमदार सिद्धार्थ खरात यांचे गावोगावी जल्लोषात स्वागत, मतदारसंघात विजयाचा आनंदोत्सव

## आमदार मतदार व कार्यकर्त्यांच्या भेटीला

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर :** मेहकर लोणार विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी अवघ्या तीन महिन्याच्या कालावधीत संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढून मतदार व महाविकास आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्याच्या बळावर विजय संपादित करून इतिहास घडवला आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांचे आता मतदारसंघात गावोगावी जल्लोसात स्वागत केले जात असून मतदार संघात रात्री बेरात्री पोहचल्यानंतर प्रचंड संख्येने आमदार सिदार्थ खरात यांचे स्वागत करून आनंदोत्सव साजरा केला जात आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांनीही विजयानंतर मतदार व कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी संपूर्ण मतदार संघात जाऊन भेटीगाठी घेण्यावर भर दिला आहे. मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या बळावर नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली. अवघ्या तीन महिन्याच्या काळातच त्यांनी संपूर्ण मतदारसघ पिंजून काढत गावागावात भेटी दिल्या. मतदारसंघातील समस्या जाणून घेतल्या, मतदारांशी व पदाधिकारी कार्यकर्त्यांशी संवाद साधून समस्यांची माहिती घेत त्या कशा पद्धतीने सोडविल्या जातील यावर पर्याय काढण्यासाठी सुरुवातीपासूनच प्रयत्न केला. आमदार सिद्धार्थ खरात यांचे विकासाचे व्हिजन, मनमिळाऊ व्यक्तिमत्व, सर्वांना सोबत घेऊन विकास कामे करण्याची वृत्ती, या सर्वांमुळे मतदार संघात अवघ्या तीन महिन्यात त्यांनी प्रचंड लोकप्रियता मिळवली आणि तब्बल लाखांवर मते घेत विजय संपादन केला. निवडणूक निकालाला अवघ्या आठ दिवस होताच त्यांनी मतदारसंघात दौरा काढन विजयासाठी परिश्रम घेणाऱ्या मतदार महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या भेटीगाठी सुरू केल्या. यादरम्यान त्यांचे गावागावात जल्लोसात स्वागत केले जात असून मतदारसंघात विजयाचा आनंद उत्सव साजरा केला जात आहे. मतदार संघातील पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासोबतच प्रत्येक मतदारांच्या मनात आमदार सिद्धार्थ खरात यांनी आपुलकीचे स्थान निर्माण केले. नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचे गावात एन्ट्री होताच गावात आनंदोत्सव साजरा होताना दिसून येत आहे.





### अल्पावधीतच प्रचंड लोकप्रियता

मंत्रालयीन सहसचिव पदावरून सिद्धार्थ खरात यांनी स्वेच्छानिवृत्ती घेत समाजसेवा करण्याचा निर्णय घेतला. अवघ्या तीन महिन्यात त्यांनी मेहकर लोणार मतदार संघातील प्रत्येक गावात पोहोचून प्रत्येक गावातील समस्या जाणून घेतल्या. गावातील रस्ते, पाणी वीज आदी प्राथमिक सुविधा सुद्धा नसल्याचे यावेळी त्यांच्या लक्षात आले. त्यांनी प्रत्येक गावात या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण जीवाचे रान करू असे आश्र्वासन देत मतदारांमध्ये विश्वास निर्माण केला. याच विश्वासाच्या बळावर अवघ्या तीन महिन्यात त्यांनी मतदारसंघातील घराघरात व मतदाराच्या मनामनात एक आदराचे स्थान निर्माण करून प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्र्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्र्िचम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्र्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्र्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

## 'फिल्म इंडस्ट्री हादरली, आणखी एका अभिनेत्रीने गळफास लावून आयुष्य संपवलं

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकप्रिय अभिनेत्री शोभिता शिवन्नाचा मृत्यू झाला आहे. शोभिता कन्नड टीव्ही इंडस्ट्री आणि चित्रपट जगतातला प्रसिद्ध चेहरा होती. शोभिता शिवन्ना रविवार १ डिसेंबरला तिच्या हैदराबादच्या घरात मृत अवस्थेमध्ये आढळली. शोभिताने स्वत:ला गळफास लावून आयुष्य संपवल्याचा संशय पोलिसांना आहे. शोभिताचा मृतदेह तिच्या घरात पंख्याला लटकलेल्या अवस्थेत पोलिसांना आढळला आहे. यानंतर पोलिसांनी पुढचा तपास सुरू केला आहे. शोभिताचा मृतदेह पोलिसांनी पोस्टमॉर्टमसाठी जवळच्या शासकीय हॉस्पिटलमध्ये पाठवला आहे.

ई टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार अभिनेत्रीने ३० नोव्हेंबरच्या रात्री गळफास घेऊन जीवन संपवलं. शोभिता ३० वर्षांची होती. मूळच्या कर्नाटकची असलेल्या शोभिताने लग्न केलं होतं, त्यानंतर २ वर्षांपासून ती हॉस्पिटलमध्ये राहत होती. शोभिताने टोकाचं पाऊल का उचललं? याबाबत अजून काहीही स्पष्ट झालेलं नाही. शोभितावर बंगळुरूमध्ये अंत्यसंस्कार केले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

शोभिताने कन्नड टीव्हीमधून करिअरला सुरूवात केली होती. काही वर्ष ती टीव्ही जगतात चर्चेतला चेहरा होती. शोभिताने १२ पेक्षा जास्त पॉप्युलर टीव्ही शोमध्ये काम केलं होतं. एटीएम, जॅकपॉट सारख्या अनेक चित्रपटांमध्येही शोभिताने अभिनय केला. कन्नड चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो मध्ये शोभिता शेवटची दिसली होती, यातल्या तिच्या कामाचं कौतुकही झालं होतं. सोशल मीडियावरही शोभिता चित्रपटाचं प्रमोशन करत होती. लग्नानंतर २ वर्ष शोभिता हॉस्पिटलमध्ये राहून तेलुगू चित्रपटात संधी शोधत होती.

## तुम्ही भाजीत जास्त प्रमाणात लसूण वापरताय? आरोग्यावर होईल 'असा' परिणाम



भारतातील स्वयंपाकघर असो किंवा जगातील कोणतेही स्वयंपाकघर, लसूण हा सर्वात जास्त वापरला जाणारा घटक आहे. कोणत्याही रेसिपीमध्ये लसूण मिसळले तर खाद्य पदार्थांची लज्जत वाढते. यासोबतच लसूण आरोग्याच्या दृष्टीनेही खूप फायदेशीर आहे. तर, काही लोक लसणाच्या तीव्र वासामुळे त्याचा अन्नात जास्त वापर करत नाहीत. लसणामध्ये व्हिटॅमिन बी १, कॅल्शियम, तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस आणि लोहासह अनेक पोषक घटक असतात. इतकी फायदेशीर गोष्ट असूनही लसूण खाण्याचे अनेक तोटे आहेत. म्हणूनच त्याचं नेहमी मर्यादित प्रमाणात सेवन करावं.

विशेषत: भारतात काही घरांमध्ये भाजी बनवताना आणि इतर पदार्थांमध्येही लसूण जास्त प्रमाणात वापरला जातो. पण लसूण हा गरम स्वरुपाचा आहे. त्यात, भाज्यांमध्ये खूप मसाले देखील टाकले जातात. अशा स्थितीत हे सर्व मिसळून पोटात काय होत असेल? याचा अंदाज तुम्ही लावू शकता. भाजीमध्ये लसणाच्या कळ्या अनेकदा वापरताना विशेष लक्ष द्या. जेणेकरून लसूण जास्त प्रमाणात पडणार नाही.

आपण जास्त लसूण का खाऊ नये?

लसूण हा आयुर्वेदाच्यादृष्टीने महत्त्वाचा घटक मानला जातो. परंतु, कोणत्याही गोष्टीचा अतिरेक शरीरासाठी हानिकारक असतो. अधिक प्रमाणात लसूण खाल्ल्याने शरीराला त्रास उद्भवू शकतो.

तोंडाला दुर्गंधी येणे

लसणाचा प्रभाव हा गरम असतो, म्हणूनच लोक सर्दी आणि खोकला झाला असताना त्याच्या कळ्या चघळतात. पण काही लोक जास्तच लसूण खातात त्यामुळे तोंडात दुर्गंधी येऊ लागते. लसूण मर्यादित प्रमाणात खाल्ला पाहिजे. अन्यथा विविध समस्या भेडसावू शकतात. जास्त लसूण खाल्ल्यास पोटात गरम पडू शकते.

रक्तदाब कमी होणे

ज्यांना रक्तदाबाचा आजार आहे, त्यांनी लसूण खाऊ नये. कमी रक्तदाब म्हणजेच हायपोटेन्शनची तक्रार असू शकते. त्यामुळे शरीरात अशक्तपणा आणि थकवा येऊ लागतो. त्यामुळे लसूण खाणे थोडे टाळा.

छातीत जळजळ

लसूण जास्त खाल्ल्यास छातीत जळजळ होण्याची तक्रार वाढू शकते. लसणात ॲसिडीक कंपाऊंड खूप जास्त असतात. याचे अधिक सेवन केल्याने छातीत जळजळ होते. कधीकधी ते सहनशक्तीच्या बाहेर देखील जाऊ शकते. त्यामुळे जेवणात लसूण वापरताना नेहमी काळजी घ्या.

## कोणतेही कारण नसताना कमी होत असेल वजन, तर वेळीच सावध व्हा, हे आहे आतड्यातील कर्करोगाचे लक्षण

कॅन्सर हा एक प्राणघातक आजार असून या आजाराचे रुग्ण दरवर्षी वाढत आहे. हा रोग शरीराच्या कोणत्याही भागात विकसित होऊ शकतो. जेव्हा कॅन्सर आतड्यात होतो, तेव्हा त्याला कोलन कॅन्सर किंवा आतड्यांचा कॅन्सर असेही म्हणतात. बहुतेक प्रकरणांमध्ये, हा आजार खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे होतो. दोन दशकांपूर्वीपर्यंत अमेरिकेत या कॅन्सरचे प्रमाण जास्त असायचे, पण आता भारतातही आतड्यांच्या कर्करोगाचा आलेख वाढत आहे.

स्ट्रीट फूड आणि प्रोसेस्ड फूडचे अतिसेवन हे कारण आहे. डॉक्टर सांगतात की आतड्यांच्या कर्करोगाची लक्षणे फार लवकर दिसू लागतात, परंतु बहुतेक प्रकरणांमध्ये लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळेच अनेक प्रकरणे प्रगत अवस्थेत (अंतिम टप्प्यात) समोर येतात. अशा परिस्थितीत रुग्णाचा जीव वाचवणे हे मोठे आव्हान बनते. आतड्यांच्या कर्करोगाची लक्षणे आणि प्रतिबंध करण्याच्या पद्धती काय आहेत, हे तज्ज्ञांकडून जाणून घेऊया. कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. अनुराग कुमार सांगतात की आतड्यांच्या कर्करोगात, आतड्यांच्या आत एक ट्यूमर विकसित होतो. मल (विष्ठा) मध्ये रक्त येणे आणि नेहमी बद्धकोष्ठता असणे हे याचे प्रमुख लक्षण आहे. याशिवाय अचानक वजन कमी होणे, ओटीपोटात दुखणे आणि नेहमी थकवा येणे ही देखील लक्षणे आहेत. जर एखाद्या व्यक्तीला या समस्या सतत होत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. सुरुवातीला आठवडाभर औषधे घ्यावीत. तरीही आराम मिळत नसल्यास, डॉक्टर तुमची बायोप्सी चाचणी लिहून घेऊ शकतात. या चाचणीद्वारे, आतड्यात सामान्य संसर्ग आहे की कर्करोग आहे की नाही हे ओळखले जाते.

या कर्करोगाचे चार टप्पे असल्याचे डॉक्टर सांगतात. कर्करोगाच्या पेशी प्रथम तयार होतात आणि त्यांचे विभाजन सुरू होते. दुसऱ्या टप्प्यात, कर्करोगाच्या पेशी आतड्यांमध्ये वाढू लागतात आणि गुदाशयावरही परिणाम होतो. तिसऱ्या टप्प्यात ते झपाट्याने पसरते आणि चौथ्या टप्प्यात ते शरीराच्या इतर भागातही पसरते. चौथ्या टप्प्यात उपचार करणे खूप कठीण असते.


कशा प्रकारे करायचा बचाव

लाल मांसापासून दूर रहा, मधुमेह आणि बीपी नियंत्रणात ठेवा, दारू पिऊ नका, फास्ट फूड खाणे टाळा, दररोज व्यायाम करा

## 'या' लोकांनी भोपळ्यापासून लांब राहिलेलंच बरं; नाहीतर उद्भवू शकतात आरोग्याच्या समस्या!

धकाधकीच्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवतात. यापासून सुटका मिळवण्यासाठी सर्वात महत्त्वाची कोणती गोष्ट असेल तर, योग्य आणि सकस आहार. डायबिटीज, हृदयविकार, कॅन्सरसारखे गंभीर आजार टाळण्यासाठी आहारात फळे, भाजीपाल्याचा समावेश करावा, असा सल्ला तज्ज्ञ देतात. प्रत्येक भाजीत भरपूर पोषणमूल्ये असतात. त्यामुळे भाज्यांचं सेवन आरोग्यासाठी लाभदायक ठरते. काही भाज्यांच्या साली आणि बियादेखील आरोग्यासाठी उत्तम असतात. भोपळा हा त्यापैकीच एक.

भोपळ्याची भाजी स्वादिष्ट आणि आरोग्यदायी असतेच, पण भोपळ्याच्या बियादेखील आरोग्यासाठी चांगल्या असतात. या बियांमध्ये अनेक पोषक घटक असतात. यामुळे आरोग्याशी संबंधित समस्या दूर ठेवता येतात. भोपळ्याच्या बिया पौष्टिक असतात. यामध्ये झिंक, आरोग्यदायी फॅट्स आणि मॅग्नेशियम असते. या बियांचे सेवन केल्यास शरीराला ऊर्जा मिळते.



भोपळ्याच्या बियांमध्ये फायबर मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे पोटदुखीची समस्या दूर होते. तसंच ब्लोटिंगचा त्रास दूर होऊन आराम मिळू शकतो. या बियांमुळे पोटाचे आरोग्य चांगलं राहू शकतं.

भोपळ्यात मोठ्या प्रमाणावर प्रमाणात जीवनसत्त्वे, खनिजं आणि अँटिऑक्सिडंट्स असल्यामुळे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. पण काही परिस्थितींमध्ये त्याचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. भोपळा आरोग्यासाठी फायदेशीर असला तरीही, काही लोकांसाठी मात्र भोपळा हानिकारक ठरतो. त्यामुळे भोपळ्यापासून जेवढे लांब राहता येईल ते वढे चांगले.

ईर्ीाझिाप ड्ळवश एषशली : 'या' लोकांनी भोपळ्यापासून लांब राहिलेलेच बरे; नाहीतर उद्भवू शकतात आरोग्याच्या समस्या!

भोपळा कोणासाठी हानिकारक?

जर तुम्ही लठ्ठपणाने त्रस्त असाल तर भोपळ्याच्या भाजीचे सेवन करू नका, कारण यामुळे तुमचे वजन आणखी वाढेल. तसेच, पचनाच्या समस्याही उद्भवतील.

जर तुम्ही भोपळ्याच्या भाजीचे सेवन केले तर तुम्हाला सूज येण्यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. मधुमेहाच्या रुग्णांनी याचे सेवन करू नये. यामुळे रक्तातील साखर वाढते. भोपळ्याची भाजी खाल्ल्याने ॲलर्जीची समस्या वाढू शकते. त्यामुळे त्वचेशी संबंधित समस्यांना सामोरे जावे लागते. याचे सेवन केल्याने हात आणि पायांवर लाल पूरळ आणि पूरळ येऊ शकतात.अशा परिस्थितीत तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

जर तुम्हाला अस्वस्थ वाटत असेल तर अशावेळी भोपळ्याची भाजी खाणं टाळावं. यामुळे रक्तदाब कमी होऊ शकतो. यामुळे उलट्या होऊ शकतात.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मोहन भागवत जे बोलले ते त्यांनी नरेंद्र मोदींना जाऊन सांगावे

## असदुद्दीन ओवैसी यांची मोहन भागवत यांच्यावर टिका

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : पंतप्रधान नरेंद्र मोदीच त्यांच्या भाषणात बोलले होते की, मुस्लीम महिला जास्त मुलांना जन्म देतात. आता मोहन भागवत जे बोलले ते त्यांनी नरेंद्र मोदींना जाऊन सांगावे,अशी टिका एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ओवैसी म्हणाले की, या देशात टीएफआर रेट पडला असून सगळ्यात जास्त टीएफआर रेट हा मुस्लीमांचा पडला आहे. यांचेच काही खासदार म्हणतात दोनच्या वर मुले नकोत, एकीकडे असे बोलत आहेत. आंध्र प्रदेश, तेलंगणामध्ये जो कोणी नगरपंचायतची निवडणूक लढणार त्यांना दोनच्यावर मुले असायला नकोत,असा कायदा आहे. विधानसभा निवडणुकीत एका व्हिडिओत भाजपची एक महिला पैसे वाटत आहे, मात्र तिच्यावर कारवाई



न होता उलट कारवाई जलील यांच्यावर झाली,अट्रोसिटी चा गुन्हा दाखल झाला. निवडणुकीत व्हीव्हीपॅटची शंभर टक्के मतमोजणी झाली पाहिजे, काही लोक वोट जिहाद असे बाबतात पण त्यांच्यावर कारवाई होत नाही, इलेक्शन फ्री अ‍ॅन्ड फेअर झाली पाहिजे, पैशांची उधळपट्टी करुन निवडणूक होऊ नये, यात आरओ काय करत आहेत. सगळे तरी कारवाई झाली नाही, मोदी सरकारने एसजीआय ठेवला पाहिजे, आता भाजपची सरकार आहे. तर त्यांचाच माणूस मुख्यमंत्री होणार आहे.एमआयएमच्या पराभवाबाबत बोलताना ओवैसी यांनी मतदान चांगले झाले, बहुतेक ठिकाणी आम्ही दोन नंबरला होतो. आम्ही आमच्या पराभवाची कारणे शोधू, असे म्हणून मनोज जरांगे पाटील यांनाही धन्यवाद दिले.तर अजमेर शरीफ हे सर्व धर्म समभाव असलेले स्थळ आहे. मात्र सुरू असलेल्या या सर्व गोष्टीमुळे देश मजबूत होणार नाही. मोहन भागवत यांच्या जिभेवर मला भरोसा नाही. ते एकीकडे सांगतात दुसरे आणि करतात दुसरेच. मोहन भागवत म्हणतात मुलं जन्माला घाला, ते काय देतील ते सांगावे, काही स्कीम ते आणणार आहेत का असा प्रश्र्नही यावेळी त्यांनी केला. टीएफआर रेट हिंदू आणि मुसलमान यांच्यातील खूप वेगळा आहे. जर तुम्ही बोलत असाल की मुलांना जन्म द्या तर त्यासाठी लाडकी बहीण सारखी एक योजना आणा, अशी उपरोधिक टिकाही यावेळी एमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी केली.

## सध्यातरी आम्ही आमदाराचं आहोत आमच्या भविष्याचा निर्णय आमचे वरिष्ठ घेतील - डॉ.राहुल आहेर

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : चांदवड –देवळा मतदार संघ कायम स्वरुपी अवर्षण प्रवण क्षेत्रात मोडला जातो. हा दुष्काळाचा कलंक येत्या पाच वर्षात पुसुन टाकण्यासाठी आपण सर्व कार्यकर्ते व हितचिंतकांनी काम करावे असे आवाहन भाजपाचे आमदार डॉ. राहुल आहेर यांनी चांदवड येथील आभार मेळाव्यात व्यक्त केले. तर सर्व सामान्य मतदारांनी अमिषाला बळी न पडता भाजपाच्या व महायुतीच्या कामावर विश्र्वास ठेऊन मोठ्या मताधिक्याने विजयी करुन दिले. सर्व सामान्य मतदार सुज्ञ आहे. हे इलेक्शन हे विलक्षण होते. नितीमुल्यांला जागुन सर्वानी काम केले यापुढेही मतदार संघातील पाणी प्रश्र्न सोडविण्याचा माझा मुळ उद्देश आहे. ते पुर्ण करणार गेल्या दहा वर्षात मतदार संघातील जे कामे झाली नाहीत ते यापुढे पुर्ण करावे लागणार आहे. चांगले कामे करणार आहेत. पुढील पाच वर्षात दोन्ही तालुक्याचा दुष्काळाचा कलंक पुसायचा आहे. शेतकऱ्यांची शेती पाण्यावाचुन राहू नये यासाठी पुर्ण ताकद आपल्याला सरकार दरबारी खर्च करावयाची आहे. असे प्रतिपादन आमदार डॉ. राहुल आहेर यांनी चांदवड तालुका भारतीय जनता पार्टी, शिवसेना , राष्ट्रवादी कॉंग्रेस , आर.पी.आय. ( अ ) मित्नपक्ष सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मित्नपरिवार यांचा महायुतीचे व भाजपाचे उमेदवार डॉ. राहुल आहेर यांचा प्रचंड मतानी विजय झाल्याने त्यांचा आभार मेळावा रविवार दि. १ डिसेंबर २४ रोजी चांदवड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेल हॉलमध्ये संपन्न झाला . यावेळी आमदार डॉ . राहुल आहेर म्हणाले की , जनतेने मला भरभरून दिले .मतदार किती सुज्ञ असल्याचे निवडणुकीत दाखवून दिले .मतदारांच्या विश्र्वासाला तडा जाऊ दिला नाही . या दहा वर्षात जेवढे कामे झाले त्यापेक्षा जास्त कामे होतील.

## दुर्गाडी किल्ल्याच्या कामाला स्थगिती; पीडब्ल्यूडीच्या नोटीस नंतर आमदार विश्वनाथ भोईर आक्रमक





दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याणमधील ऐतिहासिक दुर्गाडी किल्लयाच्या डागडुजीचे काम पुन्हा स्थगित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कामासाठी साडेबारा कोटींचा निधी मंजूर केला होता, ज्यामधील साडेसात कोटींचं काम पूर्ण झालं आहे. मात्र, उर्वरित कामाला स्थगिती देण्यात आली आहे.१९८४ साली त्या वेळाची परिस्थिती पाहता न्यायालयाने कुठलेही काम करू नये असे आदेश काढले होते मात्र त्या वेळी न्यायालयाच्या या आदेशानंतर शिवसैनिकांनी पुन्हा न्यायालयामध्ये याचिका दाखल करत किल्लयाची दुरवस्था दाखवत डागडुजी साठी परवानगी देण्यात यावी अशी मागणी केली होती. यावर न्यायालयाने १९९४ साली किल्लयाची दुरवस्थाची ठेकेदारांऐवजी शासनामार्फत काम करण्यात यावं असे आदेश दिले होते मात्र आता काही तक्रारदारांनी पुन्हा १९८४ सालचा दाखला देत संबंधित पालिका अधिकारी व पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांना हे काम पुन्हा बंद करण्याचे पत्र दिले मात्र पालिका अधिकारी या पत्राची कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता हे काम बंद करण्याचे पत्र संबंधित पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांना दिले. पालिकेच्या या पत्रावर कारवाई करत आता पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांनी चक्क संबंधित ठेकेदारांना हे काम पूर्णपणे बंद करण्याची नोटीस बजावली आहे. या स्थगितीमुळे शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कल्याण पश्र्चिम मधील आमदार विश्र्वनाथ भोईर यांनी या प्रकरणावर भाष्य करत असताना पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांना नोटीस बजावताना दुसरी बाजू न तपासल्याचा म्हणत याची खरी बाजू प्रशासनाकडे मांडली जाईल असे म्हटले आहे.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवास उत्साहात सुरुवात

**नांदेड/प्रतिनिधी** :क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड, राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ व युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन ०१–०२ डिसेंबर,२०२४ या कालावधीत मंच क्रं.०१– जिल्हा क्रीडा संकुल, बास्केटबॉल मैदान, नांदेड, मंच क्रं. ०२– डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, स्टेडियम परिसर, नांदेड व मंच क्रं.०३– जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड, या ठिकाणी करण्यात आले.

या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उदघाटन आज ०१ डिसेंबर,२०२४ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सान्वी जेठवाणी (राज्य निवडणुक दुत,भारत सरकार), श्रीमती चंदा रावळकर (युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, नांदेड), मा.श्रीमती कविता जोशी (जिल्हा समन्वयक,सी.सी.आर.टी न्यु दिल्ली) व्यासपीठावर संजय बेतीवार (क्रीडा अधिकारी), बालाजी शिरसीकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा कार्यासन), चंद्रप्रकाश होनवडजकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक), राहुल श्रीरामवार (क्रीडा अधिकारी), विपुल दापके (क्रीडा अधिकारी), संतोष कनकावार (वरिष्ठ लिपीक) आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवा महोत्सव म्हणजे युवकाना आपल्या मधील कलागुण दाखविण्याचे एक खुले व्यासपीठ असुन या मध्ये युवकांचा सर्वागिण विकास करणे, देशाची संस्कृती व परपंरा जतन करणे, राष्ट्रीय एकात्मता वाढिस लावणे, युवकाना तृणधान्याचे महत्त्व पटवुन देणे, शिक्षण, उद्योग व्यवसाय, या सोबतच शेती या व्यवसायाशी युवकाची ओळख करून देणे, सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्त्व युवकाना पटवुन देणे इत्यादी बाबीवर युवा महोत्सव साजरा करण्यात येत आहे. तसेच यामध्ये प्राविण्य प्राप्त करणारे स्पर्धक हे लातूर येथे संपन्न होणा–या विभागीय युवा महोत्सवात सहभागी होणार आहे. तसेच राज्यस्तरीय युवा महोत्सव आयोजनाचे यजनाम पद नांदेड जिल्हयास मिळालेले असल्यामूळे नांदेड जिल्हयातील जास्त–जास्त स्पर्धक सहभागी होण्याबाबत शुभेच्छा दिल्या.

या युवा महोत्सवामध्ये १) सांस्कृतिक कला प्रकार:– समुह लोकनृत्य, लोकगीत २) कौशल्य विकास:– कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी), कविता (५०० शब्द मर्यादा सहभाग संख्या ०१), ३) संकल्पना आधारीत स्पर्धा:– विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना (Innovation in science and Technology) ४) युथ आयकॉन:– युथ ऑयकान जिल्हयातुन युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित कार्य केलेल्या १५ ते २९ वयोगटातील ५ युवांना विभागीयस्तरावर सहभागी होता येणार आहे.

उदघाटन प्रसंगी श्रीमती सान्वी जेठवाणी (राज्य निवडणूक दुत,भारत सरकार) यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा त्यांचे कलागुण विकसित व्हावेत यासाठी शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याचा स्पर्धकांनी उपयोग करुन घ्यावा. त्याचबरोबर मनोरंजनाबरोबरच स्पर्धकांनी खेळाकडे वळावे याबाबत मार्गदर्शन केले. या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाकरीता श्रीमती सान्वी जेठवाणी यांचेबरोबरच विविध कलाप्रकाराचे परिक्षक म्हणुन संदीप काळे, डॉ. पांचाळ पांडुरंग, डॉ.संदीप देवुळगांवकर, डॉ.मनिष देशपांडे, डॉ.शिवराज शिंदे, डॉ.आनंद आष्टुरकर, डॉ.संभाजी मनुरकर, डॉ.बालाजी पेनूरकर, श्रीमती कविता जोशी, आदी परीक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

# गटनेता म्हणून आव्हाड तर मुख्य प्रतोद म्हणून रोहित पाटील यांची निवड

## राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे गटनेता म्हणून आमदार जितेंद्र आव्हाड यांना निवडण्यात आले आहे. तर, पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून रोहित पाटील यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुंबई येथे दि.१ डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की, मनसेची इच्छा असेल आणि त्यांना आम्ही म्हणतोय असं वाटतं असेल तर त्यांनी सोबत यावे, विधिमंडळ पक्षाचे नेत्याबद्दल अधिवेशन काळात निवड होईल, आमची संख्या कमी असली तरी आम्ही विधीमंडळात प्रश्र्न मांडू, नुकत्याच झालेल्या निवडणुकीतमध्ये ५ वाजल्या नंतर महाराष्ट्रामध्ये मतदान वाढले ही चिंतेची बाब आहे. मतदान कसे वाढले तर ईव्हीएम मशीन हे सिम्पल कॅलक्युलेटर आहे तरी सुद्धा रात्री आपोआप वाढते असा प्रश्र्न त्यानी केला.मरकडवाडी येथे एक उपक्रम होतोय की तेथील गावच्या लोकांनी ठरवले परत निवडणूक घायची आणि आणि हे बॅलेट पेपरवर घेणार आहे. जानकर यांच्या इथे मतपेट्या ठेवलेले त्यात दोन युवकांना पकडले त्यांच्याकडे १४ लॅपटॉप आणि फोन मिळाले तरी, त्यांच्यावर गुन्हा दाखल नाही मग आता या पुढील निवडणूक बॅलेट पेपरवर घ्यावे याला आमचे समर्थ्यन आहे आणि बाबा आढाव यांच्या भूमिकेला सुद्धा समर्थन आहे. निवडणूक आयोगाने देखील त्यात साईट बंद केली आहे आणि जाणीव पूर्वक निवडणूक आयोग हे का करत आहे ?असा प्रश्र्न उपस्थित केला. या आधी आम्ही तक्रारी अर्ज दाखल केल्या आहेत. जे मतदान झालं त्यात ईव्हीएम मशीन ताब्यात येत नाही तो पर्यंत उत्तर मिळू शकत नाही,महाराष्ट्रामध्ये अनेक प्रश्र्न आहेत. सोयाबीन दर हे शेतकऱ्यांना मिळावा तर सरकारने लवकरात लवकर शपथ विधी घ्यावा, राज्यातून अनेक प्रकल्प बाहेर जाण्याची प्रथा सुरु आहे ती बंद करावी, हे सरकार श्रीमंत आहे त्यांना बरोबर पैसे मिळतील,शपथ विधी नंतर पैसे मिळतील, आमचा पराभव झाला त्यामुळे त्यांचा शपथ विधी का लांबतोय हे आम्ही बोलू शकत नाही.आमचा सरकार आले असते तर आम्हाला २६ च्या आधीच शपथ घ्यावी लागली असती नाही तर राष्ट्रपती राजवट लागली असती आता हे लोक भाजपचे आहेत म्हणून आता लागणार नाही. लोकसभेच्या आधी जम्मू आणी हरियाणा निवडणूक झाली तिथे सुद्धा वाटलेले आम्हाला आमचे सरकार येईल पण तसे झाले नाही, राज्यात वेगळा निर्णय कसा, आता अजित पवार यांनी काढलेला निर्णय यावर बदल होईल,दोन पेक्षा जास्त अपत्य असलेल्या उमेदवाराला निवडणूक लढवता येणार नाही तो निर्णय बदलावा लागेल. या ठिकाणी २०१९ नंतर २०२४ पर्यंत ५ लाख वोट वाढले पण २०२४ लोकसभा आणि विधानसभा पर्यंत ४६ लाख मत वाढली आहेत हे कसे असा प्रश्र्नही यावेळी जयंत पाटील यांनी केला. मरकडवाडीमध्ये आम्ही प्रयोग नाही करत तर गाव करत आहेत आणि



आता झालेला मतदान आणि त्या दिवशी झालेला मतदान याला फरक दिसेल. रोहित पाटील हे आर. आर. आबा यांचे सुपुत्र आहेत. आम्ही या ठिकाणी तरुणांना संधी दिली आहे. महायुतीच्या सरकारमध्ये काहीही होऊ शकते, असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. सरकारने मोठे मन दाखवले तर त्या ठिकाणी विरोधी पक्ष नेता होईल पण आता त्यांच्याकडे निर्णय आहे.असे मत यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केले.

## महत्त्वाचे...

### लवणकार समाजाच्या राष्ट्रीय महासंमेलनात माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती




दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी** : अखिल भारतीय लवणकार (आगरी) समाजाच्या नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय महासंमेलनात २८ राज्यांमधील लवणकार प्रतिनिधींनी समाजाच्या प्रगतीसाठी एकत्र राहून कार्य करण्याचा निर्धार केला असून महाराष्ट्रातून माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी भारताच्या जडणघडणीत लवणकार समाजाचे योगदान मोठे असल्याचे नमूद केले. तसेच सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले. या वेळी केंद्रीय अन्न नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, लवणकार समाजाचे गुरू पुरुषोत्तम आनंदपुरी महास्वामी जी, बिहारच्या माजी मंत्री अनिता देवी, राला श्रीरामूलू सागर, महाराष्ट्रातून दशरथ पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. कृष्णकुमार भारती यांनी महासंमेलनाचे आयोजन केले होते.

### जालना ते नांदेड समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : जालना ते नांदेड समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनाला जालन्यातील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. शेतकऱ्यांच्या जमीनी असताना त्यांना योग्य मोबदला दिला जात नाही. बागायत जमीन असताना ती जमीन कोरडवाहू म्हणून नोंद करत आहेत. त्यामुळे बाजारभावानुसार या सर्व शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे. जोपर्यंत योग्य मोबदला मिळत नाही तोपर्यंत शासनाच्या कर्मचाऱ्यांना शेतात पाय ठेवू देणार नसल्याची भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे.

### विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत जनतेमध्ये नाराजी : खा.डॉ. कल्याण काळे

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून राज्यभरात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आहे, असे मत खा. डॉ. कल्याण काळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी खा. डॉ. कल्याण काळे म्हणाले की, असे काही पोलिंग बूथ आहेत की जिथे आम्हाला काही मतच मिळाली नाहीत आणि समोरच्याला जास्त मते मिळाली आहेत. कायदेशीर बाबी तपासण्यासाठी तत्परतेने जे कामे व्हायला पाहिजे ते होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यभरात लोक उठाव करणार आहेत.अशी मत खा. डॉ. कल्याण काळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### अराजकतेचा कहर! बांगलादेशात भारतीय हिंदू तरूणाला कट्टरपंथीयांनी केली मारहाण

धाका : बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या अल्पसंख्यांक हिंदू समाजावरील अत्याचाराने आता कळस गाठल्याची चिन्हं आहेत. कोलकाता मध्ये निवास करणाऱ्या सयान घोष जेव्हा काही कामानिमित्त धाकाला गेला होता, त्या वेळेस त्याला त्याचा धर्म कोणता हे विचारून काही कट्टरपंथीयांनी मारायाला सुरूवात केली.



बांगलादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांवर चालू असलेल्या हल्लयांदरम्यान, सयान घोष नावाच्या भारतीय हिंदू व्यक्तीने त्याच्या धार्मिक ओळखीबद्दल बांगलादेशात त्याच्यावर कसा हल्ला केला गेला हे सांगितले. माध्यमांशी संवाद साधताना सयान म्हणाला काही स्थानिक रहिवासी माझ्याजवळ आले व माझी विचारपूस करू लागले. तेव्हा त्यांना मी सांगितले की मी भारतीय आहे. त्यांनी माझ्या धर्माबद्दल विचारले तेव्हा मी त्यांना सांगितले की मी हिंदू आहे. त्यानंतर त्यांनी मला कडेवर घेऊन बेदम मारहाण केली. त्यांनी माझा मोबाईल, पैसे आणि इतर सामान हिसकावून घेतले.त्यांनी माझ्या तोंडावर चाकूने वार केले. तसेच माझ्या डोक्यात दगड घातला.

सायन घोष हा कोलकत्याच्या बेलघरिया परिसरातील रहिवासी आहे. यावर्षी २३ नोव्हेंबर रोजी तो आपल्या मित्रासह ढाका येथे गेला होता.घोष खरेदीसाठी बाहेर असताना ५ ते ७ जणांच्या टोळक्याने त्याची विचारपूस केली. तो हिंदू हे लक्ष्यात येताच त्याच्यावर हल्ला केला गेला.तुम्ही भारतीय हिंदू आहात. आमच्या देशात का आलास, असे प्रश्र्न ते घोष याच्यावर तुटून पडले. त्याला वाचवायला कोणीही आले नाही. बांगलादेशाच्या पोलिसांनी सुद्धा बोटचेपेपणाची भूमिका घेतली गेली.

# धाड दंगल प्रकरणातील मुळाशी जाऊन दोषींवर कडक कारवाई करा

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पोलीसांना केली सुचना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : धाड येथील दंगल प्रकरणाच्या मुळाशी जाऊन दोषींवर कडक कारवाई करा अश्या सूचना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज पोलीस विभागाला दिल्या आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील धाड येथे ३० नोव्हेबरला टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त रॅली काढण्यात आली होती ही रॅली धाड येथील स्टेट बँक चौकात आल्यानंतर किरकोळ वाद झाला होता हा वाद गावातील लोकांनी मिटवल्यानंतर रात्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर फटाके फोडण्यात आहे त्यानंतर दोन गटांमध्ये वाद विवाद होऊन दगडफेक झाली त्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत धाडमध्ये जमाबंदी लागू केली आज १ डिसेंबरच्या सायंकाळी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी धाड येथे जावुन घटनेची माहिती घेतली.



यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील ठाणेदार नरेंद्र पेदोर उपस्थित होते त्यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पोलिसांना सूचना केल्या की जिल्ह्यात वारंवार दंगलीचे प्रकार घडत आहे तेव्हा घटनेच्या मुळाशी जाऊन घटना घडवून आणणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करा कारवाई करत असताना निर्दोष नागरिकांना यामध्ये गोवु नका अशा सूचना केल्यात शिवाय धाड परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरेचे फुटे चेक करून घटनेची माहिती जाणून घ्या व गावात अशांतता निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोरात कठोर कारवाई करा अशी सूचना ही त्यांनी यावेळी दिल्यात.

गावामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी दोन्ही गटातील नागरिकांनी परस्पर सहकार्य करून एकोप्याचे वातावरण निर्माण करावं असं आवाहन ही त्यांनी यावेळी केलं त्यांच्यासोबत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ओमसिग राजपूत निलेश गुजर श्री खडके यांच्या सह गावातील हिंदू मुस्लिम समाजाचे नागरिक उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### 'ती रात्र आणि हा दिवस' नाटकाने दिला माणुसकीचा संदेश



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेत शनिवारी (ता.३०) मुक्ताई प्रतिष्ठान, देगलूरतर्फे कुसुम नाट्यगृहात सादर झालेल्या 'ती रात्र आणि हा दिवस' या नाटकाने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. माणसातील विकृती दूर करून माणूसपण जागवण्याचा संदेश देणाऱ्या या नाटकाने समाजमनाला अंतर्मुख केले.

विना आणि डॉ. रणजित देसाई यांचे सुखी कुटुंब अचानकपणे दरोडेखोर बबन गव्हाणकरच्या आगमनाने हलते. पोलिसांना चुकवत तो डॉक्टरांच्या घरात प्रवेश करतो. गोळी लागल्यामुळे उपचारासाठी डॉक्टरांना धमकावणाऱ्या बबनची खरी ओळख उघड होताच नाटकाला कलाटणी मिळते. पायलच्या अपंगतेचे कारण बबन असल्याचे कळताच डॉ. देसाई संतप्त होतात आणि त्याला ठार मारण्याचा निर्णय घेतात. मात्र, विना देसाई यांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्या आपल्या पतीला डॉक्टरांचा धर्म वाचवण्याचा असल्याचे पटवून देतात. पुढे बबन गव्हाणकरच्या पश्र्चातापाची भावना अधोरेखित करत देसाई कुटुंब त्याची मुलगी दत्तक घेण्याचा निर्णय घेतात. त्यांच्या या कृतीमुळे बबनच्या मानसिकतेत मोठा बदल होतो. शेवटी तो पोलिसांच्या स्वाधीन होतो, पण त्याच्या मुलीला मिळालेल्या प्रेमामुळे त्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो.या नाट्यमय कथानकाचे सादरीकरण दिग्दर्शक डॉ. मनीष देशपांडे यांनी कौशल्याने केले. लेखक सुहास देशपांडे यांची लेखणी आणि दिग्दर्शकाची परिपक्व हातोटी नाटकाला वेगळी उंची प्रदान करतात. नेपथ्य अविनाश रामगिरवार, प्रकाश योजना अनिल देशपांडे, संगीत गुलाबराव पावडे, वेशभूषा अदिती देशपांडे व मयुरेश विष्णुपुरीकर यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. रंगमंच व्यवस्था सौ. सूचिता देशपांडे यांनी यशस्वीपणे सांभाळली. कलाकारांमध्ये राजश्री जोशी, अक्षय भाले, रमेश पतंगे, सुशेन पाटील, अभिज्ञा देशमुख, गुलाबराव पावडे आणि आदिती अग्निहोत्री यांनी आपापल्या भूमिका प्रभावीपणे साकारल्या. प्रेक्षकांनी या नाटकाला भरभरून दाद दिली. गुलाबी थंडीतही नाट्यगृहात अलोट गर्दी जमली होती, हे विशेष. प्रेक्षकांनी या नाटकाला प्रतिसाद दिला. या कार्यक्रमासाठी किरण चौधरी व त्यांची टीम परिश्रम घेत आहे.

### राजभवन येथे नागालँड व आसाम राज्य स्थापना दिवस साजरा; भावनिक ऐक्य वाढण्यासाठी उत्तर पूर्व राज्यांना भेट देण्याचे राज्यपालांचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आपल्या राज्य स्थापनेपासून नागालँड व आसाम या राज्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती व पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. दोन्ही राज्यांना निसर्ग संपदेचे वरदान लाभले आहे. देशातील राज्ये समजून घेण्यासाठी त्या–त्या राज्यांना प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे व तेथील संस्कृती लोकांमध्ये राहून समजून घेतली पाहिजे. नागालँड व आसाम राज्यांना भेट देऊन तेथील लोकांशी संवाद वाढवल्यास राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत होईल. यास्तव नागरिकांनी उभय राज्यांना भेट द्यावी असे आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमाचा भाग म्हणून महाराष्ट्र राजभवन येथे राज्यपालांच्या उपस्थितीत नागालँड (१ डिसेंबर) व आसाम (२ डिसेंबर) राज्य स्थापना दिवस संयुक्तरित्या साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राजभवनतर्फे एसएनडीटी महिला विद्यापीठ व 'ईश्र्वरपूरम पुणे' या उत्तर पूर्व राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण व सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या संस्थेच्या सहयोगाने करण्यात आले. राज्य स्थापना दिवस साजरे करताना आपल्याला विविधतेतून सामान भारतीय मूल्ये दिसून येतात. त्या – त्या प्रदेशांचे गीत, नृत्य, लोककला व खाद्य संस्कृतीची माहिती होते.

आज देशातील केंद्र शासनातर्फे विविध राज्यांमधील युवकांना इतर राज्य जाणून घेण्याची संधी दिली जात आहे. अलीकडेच आपण 'वतन को जानो' व 'युवा संगम' कार्यक्रमांतर्गत जम्मू काश्मीर तसेच ओडिशा येथील युवकांना भेटलो असे सांगून केंद्र सरकारच्या या उपक्रमांमुळे युवकांना भारताची विविधता व संपन्नता पाहण्यास मिळते असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी 'ईश्र्वरपूरम' संस्थेतील नागालँड व अरुणाचल प्रदेशच्या विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध बांबू नृत्य सादर केले, तर एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी संथाली नृत्य व आसामी लोकगीत सादर केले. राज्यपालांच्या हस्ते एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा उज्वला चक्रदेव, प्र.कुलगुरु रुबी ओझा, ईश्र्वरपूरम संस्थेचे अध्यक्ष विनीत कुबेर, संस्थापक सदस्य प्रशांत जोशी यांसह उपस्थित विद्यार्थी व कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

## प्रतापराव जाधव आपले राजकीय जन्मदाते, त्यांच्याबाबत गैरसमज पसरवणे चुकीचे

### माजी आमदार संजय रायमूलकर

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी** :राजकारणाचे बाळकडू आपल्याला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पाजले. त्यांचेच बोट धरून राजकारणात शिवसेना शाखा प्रमुख पदापासून तर आमदारकीच्या हॅट्रिक पर्यन्त आपण जाऊन पोहचलो. कालपरवा झालेल्या विधानसभा निवडणुकीत मायबाप जनतेने एका लाखापर्यंत मतदान आपल्याला केले आहे. त्यामुळे आपला राजकीय गेम केल्याचा कुणी वक्तव्य करत असेल तर त्या वक्तव्याशी व भूमिकेशी आपण सहमत नाही ,असा खुलासा माजी आमदार संजय रायमूलकर यांनी केला आहे.

बुलडाणा येथून एका नेत्याचे वक्तव्य वृतवाहिनी वरून प्रसिद्ध झाले.त्यात आपला राजकीय गेम केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केला असल्याचा आरोप करण्यात आला. तो साफ चुकीचा व खोटा आणि निराधार आहे ,असे संजय रायमुलकर यांनी म्हटले आहे. जाधव परिवाराने आपल्या राजकीय उत्कर्षासाठी सतत बळच दिले आहे. राजकीय जन्मदाते म्हणून माझ्या मनात आमचे नेते ना. प्रतापराव जाधव यांचे आणि संपूर्ण जाधव परिवाराचे एक वेगळे स्थान आहे.

त्यामुळे कुणी उगीच फेक नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न करणे चुकीचे असल्याचे माजी आमदार संजय रायमूलकर यांनी म्हटले असून तीन वेळा विजयी केलेल्या मतदाराने यावेळी माझ्या पदरात मतांचे दान थोडे कमी टाकले असेल तर त्या बाबत आपली कुठलीही नाराजी नसून आपण आत्मचिंतन करून पुन्हा नव्याने मोठ्या जोमात कामाला भिडणार असल्याचे व राज्यात महायुती ची सत्ता असल्याने ना एकनाथराव शिंदे,ना प्रतापराव जाधव याांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने मतदारसंघातील कामे करणार असल्याचेही ते म्हणाले.

## तुळजाभवानी चरणी ११ तोळ्यांची मोहनमाळ अर्पण

**तुळजापूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी देशभरातून अनेक भक्त दर्शनासाठी येत असतात. यावेळी भक्तांकडून देवीला अनेक दान अर्पण केले जाते. परभणी येथील जयश्री रमेशराव देशमुख यांनी आई तुळजाभवानीच्या चरणी ११ तोळे सोन्याची मोहनमाळ अर्पण केली आहे. यावेळी मंदिर संस्थानच्यावतीने देशमुख कुटुंबियांना देवीची प्रतिमा आणि शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कारही करण्यात आला. तुळजाभवानी देवी ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. या क्षेत्राचे महत्त्व म्हणजे स्वराज्य संस्थापक राजे श्री शिवछत्रपती यांची आराध्यदेवता, अशी ही तुळजापूरची भवानीदेवी महाराष्ट्राची कुलस्वामीनी आहे. फार मोठ्या संख्येने लोक या देवस्थानाला भेट देण्यासाठी येतात. या शक्तिपीठावर अनेक भाविकांची अपार श्रध्दा आहे. आपल्या अपार भक्तिपोटी लोक या तीर्थक्षेत्राला दान अर्पण करतात. परभणी येथील जयश्री रमेशराव देशमुख यांनी आई तुळजाभवानीच्या चरणी १–२ नव्हे तर ११ तोळे सोन्याची मोहनमाळ अर्पण केली आहे. यावेळी तुळजाभवानी मंदिर संस्थानाच्या वतीने आभारस्वरुपी देशमुख कुटुंबियांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना भेट म्हणून देवीची प्रतिमा देण्यात आली.

## अकोला रेल्वे स्टेशनवर महिलांचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी** : अकोला रेल्वे स्टेशनवरील प्लॅटफॉर्म क्रमांक सहावर आज महिलांनी आंदोलन केले आहे. या सर्व महिला अकोल साऊथ सेंट्रल रेल्वे कर्मचाऱ्यांच्या पत्नी आहेत. रेल्वे विभागाने घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात हे आंदोलन करण्यात आले आहे. तर अकोला रेल्वे स्टेशन हे सुरुवातीपासून साऊथ सेंट्रल रेल्वे मध्ये येते पण आता हे रेल्वे स्टेशन सेंट्रल रेल्वे मध्ये मर्ज करण्यात येणार असून तेथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची नांदेड, पुणे सारख्या ठिकाणी बदली करण्यात येणार आहे. आमची मुलं ही आठवी, नववीला आणि दहावीला शिकत असून त्यामुळे मुलांचे नुकसान होणार आहे त्यामुळे या रेल्वे विभागाने घेतलेल्या निर्णयाला आम्ही विरोध करत आहोत अशी प्रतिक्रिया महिला आंदोलकर्त्यांनी दिली आहे. यावेळी महिला आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## मनसेचा शिलेदार राज ठाकरेंचा विश्वासू नेता अविनाश जाधव यांचा राजीनामा

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी मनसे ठाणे जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. याप्रकरणाच्या माहितीचे एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामुळे मनसे पक्षासाठी ही धक्कादायक घटना आहे. १ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे वृत्त आहे. अविनाश जाधव हे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सच्चे साथीदार आहेत. त्यांनी घेतलेल्या या निर्णयाने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हा राजीनामा अद्यापही स्वीकारला नसल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे, बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, अविनाश जाधव यांच्यासह अनेक मनसे नेत्यांचा विधानसभा निवडणुकीमध्ये मोठा पराभव झाला आहे. मनसे पक्षाच्या हुकुमाचा एक्का राजू पाटील यांचाही विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये पराभव झाला आहे. यामुळे मतांची टक्केवारी घसरली आहे. काही दिवसांआधी मनसेचे चिन्ह गोठणार असल्याची माहिती सोशल मीडियावर व्हायरल होत होती. अशा स्थितीत अविनाश जाधव यांनी घेतलेल्या निर्णयाने राजकीय भूकंप निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# अंजनी बु शिवारात आढळले बिबट्या पावलाचे ठसे

## बिबट्याची शोधमोहीम सुरू : नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : अंजनी बु. शिवारात दि. ३० नोव्हेंबरला रात्री बिबट्याच्या पावलाचे ठसे आठळल्याने एकच खळबळ उडाली असून बिबट्याच्या शोधासाठी वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी व अंजनी बु.चे सरपंचांनी शोधमोहीम राबविली.यावेळी बिबट्याच्या पावलांचे ठसे काही ठिकाणी आढळून आलेले आहेत. त्यामुळे शेतकर्यांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे. अंजनी बु.शेतशिवारात दि. ३० नोव्हेंबररोजी रात्री बिबट्याच्या पावलाचे ठसे आढळून आले. यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती अंजनीच्या सरपंचानी वनविभागाला कळवताच वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी बिबट्याच्या शोधासाठी मोहीम राबवण्यास प्रारंभ केला. तर शेतकर्यांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन केले. शेतकरी वर्गाने शेतात एकटे जाऊ नये, तसेच हातात काठी ठेवावी, शेतात खाली बसून राहू नये, कारण बिबट्या खाली बसलेल्या व्यक्तीवरच हल्ला करण्याची शक्यता अधिक असते, शक्यतो उभे असलेल्या व्यक्तीवर बिबट्या सहसा हल्ला करत नाही, अशा सूचना यावेळी वनविभागाकडून करण्यात आल्या.त्याचबरोबर परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, बिबट्या कुठे आढळून आल्यास त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले. बिबट्याच्या पावलाच्या ठसाने मात्र परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

